CMYK

# सरासरीच्या चौपट बरसला, सात मंडळात अतिवृष्टी

सुविचार

नम्रता मानवी व्यक्तिमत्त्वाला उजाळा देते.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 103 ■ शुक्रवार दि.23 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5




पेज ४

धाराशिवमध्ये भव्य तिरंगा रॅली, शिवसैनिकांसह महिला,वारकरी,विद्यार्थ्यांचा सहभाग

# अवकाळी पावसाने रेकॉर्ड मोडले,माकणी मंडळात सर्वाधिक ८१ मिमी पाऊस

आरंभ मराठी | धाराशिव

**धाराशिव शहर आणि जिल्ह्यात सर्वत्र अवकाळी पावसाने रौद्ररूप धारण केले असून, पाऊस अजूनही थांबण्याचे नाव घेत नाही. बुधवारी सुरू झालेली पावसाची रिपरिप गुरुवारी कमी अधिक प्रमाणात सुरूच होती. अवकाळी पावसाने मागील तीस वर्षांचे रेकॉर्ड मोडले असून, यावर्षी आतापर्यंत मे महिन्यात सरासरीच्या चौपट पाऊस बरसला आहे. बुधवारी (दि.२१) जिल्ह्यातील सात महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.**



धाराशिव शहर आणि जिल्ह्यात बुधवारी (दि.२१) पडलेल्या पावसाने अवकाळी पावसाचे सर्व रेकॉर्ड तोडले. बुधवारी दुपारी जिल्ह्यात सर्वदूर पाऊस बरसला. बुधवारी दुपारी सुरू झालेला पाऊस रात्रभर सुरूच होता. धाराशिव जिल्ह्यातील सात मंडळात बुधवारी अतिवृष्टीची नोंद झाली. यामध्ये धाराशिव शहरात ७० मिमी, बेंबळी ६९ मिमी, पाडोळी ६९ मिमी, केशेगाव ६९ मिमी, उमरगा ६८ मिमी, मुळज ६८ मिमी आणि माकणी ८१ मिमी अशा सात मंडळात अतिवृष्टी झाली. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस माकणी मंडळात बरसला. जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस धाराशिव तालुक्यात ६१ मिमी झाला. तर सर्वात कमी पाऊस भूम तालुक्यात १४ मिमी झाला. जिल्ह्यात बुधवारी सरासरी ३२ मिमी पावसाची नोंद झाली. वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसाने ५० गावांचे जनजीवन विस्कळीत केले. यामध्ये टोमॅटो तसेच आंबा ऊ पिकांचे नुकसान झाले.धाराशिव, उमरगा आणि लोहारा या तालुक्यांतील ओढे, नाले वाहिले असून, छोटे बंधारे भरले आहेत. पावसामुळे धाराशिव आणि कळंब तालुक्यातील केशर आंब्याच्या बागांना मोठा फटका बसला असून, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी आर्थिक मदतीची मागणी केली आहे. पावसाचा जोर रविवारपर्यंत (दि.२५) कायम राहणार असून,या काळात वादळी वारे आणि विजांचा कडकडाट होईल असाही इशारा हवामान विभागाने दिला आहे

### अतिवृष्टीची नोंद झालेली मंडळ

| महसूल मंडळ | | झालेला पाऊस (मिमीमध्ये) |
|---|---|---|
| धाराशिव शहर | – | ७० |
| बेंबळी | – | ६९ |
| पाडोळी | – | ६९ |
| केशेगाव | – | ६९ |
| उमरगा | – | ६८ |
| मुळज | – | ६८ |
| माकणी | – | ८१ |

तालुका-बुधवारचा पाऊस-एकूण पाऊस-सरासरी पाऊस (%)

| तालुका | बुधवारचा पाऊस | एकूण पाऊस | सरासरी पाऊस (%) |
|---|---|---|---|
| धाराशिव | ६१ | १२६ | ५९२ |
| तुळजापूर | २५ | १५४ | ५९६ |
| परंडा | २२ | ६८ | ३३४ |
| भूम | १४ | ७४ | २८१ |
| कळंब | २१ | ९० | ३५७ |
| उमरगा | ४४ | १३१ | ५८४ |
| लोहारा | ४३ | १३५ | ८८६ |
| वाशी | १७ | ५८ | ३६३ |
| एकूण | ३२ | १०८ | ४१७ |

## नव उद्योजक घडविणारे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ

# सहा हजार उद्योजकांना आर्थिक बळ

### ४९९ कोटींचे कर्जवाटप,व्याज परतावा म्हणून ५२ कोटींचे साहाय्य

सज्जन यादव | आरंभ मराठी

धाराशिव -अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून धाराशिव जिल्ह्यातील मराठा समाजातील उद्योजकांना आर्थिक बळ देऊन स्वाभिमानाने जीवन जगण्याचा मार्ग दाखवला आहे. तरुणांना उद्योगाकरिता विविध योजना राबवत स्वयंरोजगारातून आत्मनिर्भर बनविण्याकरिता वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेतून धाराशिव जिल्ह्यातील ६०६० उद्योजकांना पाठबळ दिले आहे. जिल्ह्यातील सर्व बँकांनी वितरित केलेली कर्ज रक्कम ४९९ कोटी रुपये इतकी आहे. आजपर्यंत व्याज परतावा म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने ५२ कोटी रुपये उद्योजकांच्या खात्यावर जमा केले आहेत. धाराशिव जिल्ह्यामध्ये सगळ्यात जास्त कर्जपुरवठा हा वाहनाकरता करण्यात आलेला आहे. यामध्ये ट्रक्टर, पिकअप, जेसीबी, हार्वेस्टर,पोकलेन, प्रवासी वाहतूक करणाऱ्या जीप यासाठी कर्ज प्रकरण केलेल्या लाभार्थ्यांची संख्या जास्त






आहे. जिल्ह्यात फक्त ट्रॅक्टरसाठी केलेली प्रकरणे जवळपास अडीच हजार आहेत. ट्रॅक्टर, ट्रॉली, नांगर, मोगडा, रोटर, पेरणी यंत्र असे साहित्यही खरेदी करण्यात आलेले आहे. ट्रॅक्टरच्या माध्यमातून आता तरुण वर्ग शेती करत असल्यामुळे शेतीच्या कामाला बऱ्यापैकी गती आलेली आहे.जिल्ह्यातील काही तरुणांनी ट्युरिस्ट गाड्या घेऊन व्यवसाय सुरू केला आहे. तर काहींनी योजनेतून कर्ज घेऊन गाई-म्हशी घेऊन दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकांना उद्योग व्यवसाय उभारण्याकरिता मदत करण्यासाठी अण्णासाहेब पाटील महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळामुळे बेरोजगार युवकांच्या हाताला मोठ्या प्रमाणात काम मिळाले आहे. सन २०१८ पासून सुरू झालेल्या या महामंडळाच्या माध्यमातून आजपर्यंत राज्यभरात १ लाख ३८ हजार उद्योजक तयार झाले आहेत. मराठा समाजातील युवक-युवतींना उद्योगासाठी प्रोत्साहन देण्यासही महामंडळाने सुरुवात केली आहे. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेत कोणत्याही व्यवसायाकरिता कोणत्याही बँकेमार्फत व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जावरील १५ लाखांच्या मर्यादित व्याज परतावा जास्तीत जास्त १२ टक्केच्या मर्यादेत अथवा ४.५० लाखांच्या मर्यादेत व्याज परतावा करण्यात येतो. दरवर्षी जिल्ह्यामध्ये नवनवीन उद्योजक तयार व्हावे याकरिता आपण प्रयत्न करत असल्याचे अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. धाराशिव जिल्ह्यात आतापर्यंत ६०६० नवउद्योजकांना महामंडळाच्या योजनेतून कर्जपुरवठा करण्यात आला आहे. २०२४ -२५ या एका वर्षात धाराशिव जिल्ह्यात १ हजार ३२९ लोकांची कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत. आतापर्यंत ४९९ कोटी रुपये कर्ज स्वरूपात देण्यात आले असून, ५२ कोटी रुपयांचा व्याज परतावा देण्यात आला आहे. सध्या जिल्ह्यातील ५ हजार ३५९ लाभार्थ्यांना व्याज परताव्याचा लाभ मिळत आहे.

#### महामंडळाकडून तरुणांना मार्गदर्शन

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून मराठा समाजातील युवक - युवतींना उद्योगासाठी प्रोत्साहित करून महामंडळाकडून त्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याकरिता बँका तयार करून देण्यात येतात. तसेच बँकांनी दिलेल्या कर्जाला व्याज परतावा महामंडळाकडून देण्यात येतो. त्यामुळे मराठा तरुणांनी उद्योग व्यवसाय करून स्वतःची प्रगती करावी यासाठी महामंडळाकडून तरुणांना मार्गदर्शन करण्यात येते.

#### महास्वयम पोर्टलची समस्या

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे महास्वयम हे पोर्टल अपडेट केले नसल्याने अनेक दिवसांपासून पोर्टलमध्ये तांत्रिक समस्या आहेत. परिणामी, महामंडळाचे प्राथमिक मंजुरी पत्र (एलओआय) मिळणे अवघड झाले आहे. विशेष म्हणजे या पोर्टलवर बँकांचे हप्ते भरलेले क्लेमही अपलोड होत नसल्याने लाभार्थी वैतागले आहेत. आधीच व्याज परतावा नऊ नऊ महिने मिळालेला नाही, त्यात आता हप्ते भरूनही व्याज परताव्यासाठी वाट पाहावी लागत असल्याने या योजनेत अडथळा येत आहे. बँकेतून कर्ज घेतले की, त्यावर १२ टक्क्यांपर्यंतचा परतावा महामंडळाकडून दिला जातो. त्यासाठी सुरुवातीला बँकेतून कर्ज मंजूर झाले की, याची सर्व कागदपत्रे एलओआयसाठी महामंडळाकडे द्यावी लागतात. त्यांचे प्राथमिक मंजुरी पत्र मिळाले की बँकेतून कर्ज व महामंडळाचा व्याज परतावा मिळण्याचा मार्ग मोकळा होतो; मात्र सध्या महामंडळाच्या या पोर्टलमध्ये अडथळे येत असल्याने नव्या लाभार्थ्यांना हे पत्र मिळत नाही. परिणामी, महामंडळाचा लाभ घेण्यास मर्यादा येत आहेत.

## वैद्यकीय मंडळाकडून दिव्यांग,दुर्धर आजार असलेल्या शिक्षकांच्या तपासणीस विलंब

आरंभ मराठी | धाराशिव

सोलापूर येथील वैद्यकीय मंडळाकडून दिव्यांग आणि दुर्धर आजार असलेल्या शिक्षकांच्या वैद्यकीय तपासणीस उशीर केला जात असल्याने बदली प्रक्रियेत या विलंबाचा फटका बसण्याची शक्यता शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे. शिक्षकांच्या सन २०२५-२०२६ च्या बदली प्रक्रियेपूर्वी वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय सोलापूर यांच्याकडे संवर्ग -१ मधून लाभ घेणाऱ्या पात्र शिक्षकांची स्थापित वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने पात्र लाभार्थीनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडून पत्र घेऊन तपासणीसाठी वैद्यकीय अधीक्षक कार्यालय, सोलापूर यांच्याकडे संपर्क साधलेला आहे. परंतु, त्याठिकाणी संबंधित तपासणीसाठी कालमर्यादेत तपासणी करता येत नसल्याबाबतची असमर्थतता हॉस्पिटलने व्यक्त केली आहे. त्यामुळे हॉस्पिटल प्रशासनाकडून फक्त कागदपत्रे घेऊन शिक्षकांना तपासणीसाठी नियमित काम काजा व्यतिरिक्तच्या वेळेत बोलावण्यात येईल, असे सूचित केले आहे. यावरून बदली प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी व फॉर्म भरण्यापूर्वी तपासणी करून मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळे खऱ्या पात्र लाभार्थी दिव्यांग व दुर्धर आजार असणाऱ्या व्यक्ती, पालक व पाल्य यांची हेळसांड निर्माण होऊन बदलीबाबत फॉर्म भरण्यासाठी संभ्रम निर्माण झालेला आहे. दिव्यांग व दुर्धर आजार असलेल्या शिक्षकांना वैद्यकीय मंडळ सोलापूर यांच्याकडे तपासणीसाठी पाठवावे किंवा फॉर्म भरण्याबाबत योग्य ते निर्देश देऊन खरे पात्र लाभार्थी या बदली प्रक्रियेपासून वंचित राहणार नाहीत व शासन निर्णयाचे तंतोतंत पालन होऊन संबंधित लाभार्थी न्यायापासून वंचित राहू नयेत, यासाठी बदली प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी शिक्षकांमधील हा संभ्रम दूर करावा अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती व दिव्यांग कर्मचारी संघटना यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# जिल्ह्यात सव्वाशे शिक्षक अतिरिक्त ठरण्याची शक्यता

### २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार बदलीचे आदेश ?

आरंभ मराठी | धाराशिव

राज्य सरकारने शिक्षकांच्या बदली संदर्भात २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार बदल्या करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शिक्षण विभागासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. कारण शिक्षण विभागाकडून २०२३-२४ च्या संच मान्यतेनुसार माहिती अपलोड करण्यात आली होती. त्यानुसार बदल्यांची प्रक्रिया सुरू होईल असे वाटत होते. परंतु, गुरुवारी (दि.२२) झालेल्या बैठकीत २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार बदली प्रक्रिया राबविण्यास सांगितले आहे. त्यामुळे शिक्षण विभागाला पुन्हा नव्याने पोर्टलवर माहिती अपलोड करावी लागणार आहे. सध्या बदली प्रक्रियेस झालेला उशीर, शैक्षणिक वर्ष सुरू होण्यास राहिलेला कमी कालावधी यामुळे यावर्षी शिक्षकांची बदली प्रक्रिया होणार की नाही याबद्दल शंका उपस्थित केली जात आहे. यासंबंधी अधिक माहिती घेण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्रा.) अशोक पाटील यांच्याशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. यावर्षी शिक्षकांची बदली प्रक्रिया होण्याची शक्यता नसल्याचे काही शिक्षकांनी सांगितले.

#### संचमान्यतेची शिक्षकांना धास्ती

शासनाच्या आदेशाप्रमाणे २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार शिक्षकांच्या बदलीची प्रक्रिया राबविल्यास धाराशिव जिल्ह्यात सव्वाशे पेक्षा अधिक शिक्षक अतिरिक्त ठरणार आहेत. २०२३-२४ च्या संचमान्यतेनुसार शिक्षक आणि रिक्त पदे यांचा रेशो समान होता. त्यामुळे त्यानुसार एकही शिक्षक अतिरिक्त ठरत नव्हता. परंतु, २०२४-२५ च्या संचमान्यतेनुसार समाजशास्त्र विषयाचे ६६, भाषा विषयाचे ५६ आणि विज्ञान पदवीधरचे ६ असे जवळपास १२८ शिक्षक अतिरिक्त ठरू शकतात.

## केंद्रीय विद्यालयाचा प्रस्ताव केंद्राकडे त्वरित पाठवा

### खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांची सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

केंद्रीय विद्यालय स्थापनेसंदर्भात एक महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी पार पडली. आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित झालेल्या केंद्र शासनाच्या मानकांनुसार गुणवत्तापूर्ण शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असून, या पार्श्वभूमीवर केंद्रीय विद्यालय स्थापनेसाठी प्रशासनाकडून सकारात्मक पावले उचलण्यात येत आहेत. खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर यांनी धाराशिव जिल्ह्यासाठी केंद्रीय विद्यालय स्थापन करण्यासाठी शिक्षणमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे विनंती केली होती तसेच लोकसभेच्या अधिवेशन काळामध्ये या संदर्भामध्ये तारांकित प्रश्न विचारण्यात आला होता या अनुषंगाने केंद्रीय विद्यालय संघटन यांच्याकडे पाठपुरावा करण्यात आला होता.यासाठी तातडीने केंद्राकडे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना खासदार ओमराजे यांनी केल्या. जिल्ह्यासाठी केंद्रीय विद्यालयाची निकड अधोरेखित केली असून, या शाळेमुळे जिल्ह्यातील विद्यार्थी आणि पालक यांना मोठा दिलासा मिळेल, असे मत खासदार ओमराजे यांनी व्यक्त केले. त्यांनी यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही दिले बैठकीत विविध ठिकाणची संभाव्य शासकीय व निमशासकीय जागा तपासून त्यातील योग्य ठिकाण निश्चित करण्याचा विचार विनिमय करण्यात आला. तसेच केंद्रीय विद्यालय संघटनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रस्ताव तयार करून त्वरित केंद्र शासनाकडे पाठविण्याची कार्यवाही करण्यावर भर देण्यात आला

# सोयाबीन उत्पादन वाढीसाठी एआयचा वापर

### राहुरी कृषी विद्यापीठ कृत्रीम बुद्दीमत्तेचा पथदर्शक प्रकल्प करणार

#### आमदार राणा पाटील यांची माहिती

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील १०० सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या शिवारात स्मार्ट 'पीआयएस' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कृत्रीम बुद्धिमत्ता अर्थात चा वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी राहुरीच्या कृषी विद्यापीठाकडून जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना पहिल्या टप्प्यात प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सोमवारी जिल्ह्यातील शेतकरी यानुषंगाने राहुरी विद्यापीठात अभ्यास दौऱ्यावर जाणार आहेत. कृषी क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज आहे. आगामी काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence ), ड्रोन आणि रोबोटिक्ससारख्या तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून शेती उत्पादन आणि उत्पन्न वाढीसाठी हा महत्वपूर्ण प्रकल्प आपण हाती घेतला आहे. त्याला राहुरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख सहकार्य करण्यासाठी सकारात्मक असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नुकतीच भेट दिली. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) या राज्यशासनाला आर्थिक व धोरणात्मक दिशा देणाऱ्या संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून भेटीदरम्यान त्यांनी विद्यापीठातील विविध प्रकल्प व प्रयोगशाळांचा आढावा घेतला आणि शास्त्रज्ञांशी संवादही साधला. राहुरी कृषी विद्यापीठाने कृषी क्षेत्रातील




विविध तंत्रज्ञानावर मोलाचे काम केले आहे. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या शिवारात प्रत्यक्षात उतरवण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न आवश्यक आहेत. विद्यापीठाने विकसित केलेल्या 'स्मार्ट पी. आय. एस.' सेन्सर बेस सिंचन तंत्रज्ञानाचा वापर धाराशिव जिल्ह्यात आपण यशस्वीपणे करण्याचा काटेकोर प्रयत्न करीत असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले. सध्या शेतकरी बांधवांना मिळणारा पीकविमा उत्पन्नाधारीत आहे, तो उत्पन्नाधारीत असायला हवा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे. विद्यापीठातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स' अंतर्गत कृषि फवारणी ड्रोन प्रयोगशाळा, हायपरस्पेक्ट्रल इमेजींग प्रयोगशाळा, रोबोटिक्स प्रयोगशाळा, फुले स्मार्ट हवामान केंद्र, ऑटो पी. आय. एस. सिंचन प्रणाली आदींची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी बारकाईने जाणून घेतली. त्यानंतर त्यांनी जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा, बेकरी प्रकल्प, कृषी अवजारे प्रकल्प, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र आणि उद्यान विभागाच्या रोपवाटिकेलाही भेट दिली.। भेटीचे आयोजन राहुरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी डॉ. सुनील कदम, डॉ. विक्रम कड, डॉ. तुळशीदास बास्टेवाड, डॉ. योगेश सैंदाणे, डॉ. भगवान देशमुख, डॉ. सचिन सदाफळ, प्रा. अन्सार अत्तार आणि डॉ. सचिन मगर,डॉ.भगवान देशमुख यांनी विविध प्रकल्पांची माहिती दिली.

## आता नूतन एसपी रितू खोकर

आरंभ मराठी | धाराशिव

धारशिवच्या पोलीस अधीक्षक पदी २०१८ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी रितू खोकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांच्या जागी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नऊ महिन्यांपूर्वी अतुल कुलकर्णी यांच्या जागी संजय जाधव यांनी पोलीस अधीक्षक म्हणून पदभार घेतला होता. परंतु, त्यांना एक वर्षाचा देखील कार्यकाल मिळाला नाही. संजय जाधव यांना सध्या कुठेच नियुक्ती दिलेली नसून ते प्रतीक्षेत आहेत. रितू खोकर ह्या मूळच्या हरियाणा राज्यातील पानिपत येथील असून त्यांचे वडील गावचे सरपंच



होते. त्यांनी कुरुक्षेत्र विश्वमहाविद्यालयामधून एम. एस्सी. गणित विषयात सुवर्ण पदक पटकाविले होते. तत्कालीन गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांच्या या यशाबद्दल त्यांना सन्मानित केले होते. रितू खोकर या सध्या सांगली जिल्ह्याच्या अपर पोलीस अधीक्षक आहेत. त्यापूर्वी त्यांनी अकोला जिल्ह्यातील अकोट येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून काम केलेले आहे. जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक म्हणून रितू खोकर आणि अपर पोलीस अधीक्षक म्हणून शफाकत आमना अशा दोन्ही वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून महिला विराजमान झाल्या आहेत. नूतन पोलीस अधीक्षकांसमोर सध्या गाजत असलेल्या तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाचा छडा लावण्याचे आव्हान आहे.

## मुंडके छाटून वेशीला टांगतो अशी धमकी देऊन मारहाण

आरंभ मराठी | तामलवाडी

तुझे मुंडके छाटून वेशीला टांगतो अशी धमकी देऊन तुळजापूर तालुक्यातील देवकुरुळी येथे एका व्यक्तीला मारहाण केल्याची घटना घडली. यातील आरोपी नेताजी लक्ष्मण माने (रा. देवकुरुळी ता.तुळजापूर) याने दिनांक १९ मे रोजी रात्री आठ वाजता देवकुरुळी येथे फिर्यादी विक्रम विठ्ठल नवगिरे (वय ३२ वर्षे, रा. देवकुरुळी) यांचे वडील विठ्ठल भिमराव नवगिरे यांना धमकी देऊन मारहाण केली. यातील आरोपी आणि विठ्ठल नवगिरे हे नातेवाईक असून, आरोपीने जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, चाकुने मारहाण करुन गंभीर जखमी केले. तुझे मुंडके छाटुन गावातील वेशीला टांगतो अशी धमकी देऊन बेदम मारहाण केली. विक्रम नवगिरे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तामलवाडी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम १०९,२९६, ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

CMYK

# आज निर्भया म्हणून गाजत आहे, व्यथा ऐकून तिच्या मृत्यूची बाईपणावर लाजत आहे

**आरंभ** मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. आज काव्यारंभचे सोळावे पुष्प मी अश्विनी पांडुरंग धाट/ कुलकर्णी यांच्या कवितांनी गुंफणार आहे. अश्विनी धाट या अभिनव इंग्लिश स्कूल धाराशिव, येथे शिक्षीका आहेत, त्यांचे शिक्षण एम एस्सी. बी.एड झालेले आहे. धाराशिव जिल्हा सहसंपादक, जीवनगौरव मासिक औरंगाबाद, धाराशिव जिल्हा अध्यक्ष नवरत्न साहित्य परिषद, रांजनी, पंढरपूर, सदस्य-काव्यप्रेमी शिक्षक मंच मराठवाडा राज्य विभागीय अध्यक्ष काव्यप्रेमी शिक्षक मंच अध्यक्ष जीवन गौरव कवी कट्टा, महाराष्ट्र राज्य ही महत्वाची पदं सध्या त्यांच्याकडे आहेत. वाचन, लेखन ,गरजूनां मदत करणे हे त्यांचे आवडते छंद आहेत. अनेक कविता, चारोळी,बालगीतं ,श्लोक यांचे लेखन त्यांनी केलेले आहे. त्यांच्या किनारा या पहिल्या काव्यसंग्रहासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे. अनेक वेगवेगळ्या काव्यसंमेलनामध्ये त्यांचा सहभाग असतो तसेच धाराशिव आकाशवाणीवर त्यांची दोन वेळा मुलाखत पण झाली आहे. अनेक ऑनलाईन स्पर्धेचे त्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले आहे. दैनिक संघर्ष वर्तमानपत्रातून काव्यलेखन,तसेच दिनविशेष लेख प्रसिध्द झालेले आहेत. *९३ वे आखिल भारतीय साहित्य संमेलन कवी कट्टा मध्ये त्यांचा सूत्रसंचालन, व सक्रीय सहभाग होता. अश्विनी धाट यांना काव्य लेखनासाठी अनेक सन्मान व पुरस्कार .मिळालेले आहेत. -स्टोरीमिरर वेब पोर्टल तर्फे '' ऑथर ऑफ द वीक ,'' सन्मान, .वनिता बहुउद्देशीय महिला मंडळ नांदेड तर्फे हिरकणी रत्न पुरस्कार, समीक्षाब्लिकेशनतर्फेराज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, वनिता बहुउद्देशीय महिला मंडळ, नांदेड तर्फे *महाराष्ट्र गौरव पुरस्कार, सहारा एज्युकेशन अँड वेलफेअर फाऊंडेशन महाराष्ट्र तर्फे राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार २०१९,मनुष्यबळ विकास संस्था,मुंबई राज्यस्तरीय गुणीजण गौरव पुरस्कार, एकता सेवाभावी संस्था,महाराष्ट्रराज्य तर्फे राज्यस्तरीय एकता गौरव पुरस्कार वनिता विकास बहुउद्देशिय महिला मंडळ नांदेड तर्फे महाराष्ट्र गौरव पुरस्कार २०१९* वनिता विकास बहुउद्देशिय संस्था नांदेडतर्फेमहाराष्ट्रभूषणपुरस्कार, सहारा एज्युकेशन सोसायटी,महाराष्ट्र राज्य तर्फे राज्यस्तरीय तेजस्विनी गौरव पुरस्कार २०१९ जीवनगौरव संपादक सन्मान २०१८ व २०१९ तसेच जीवन गौरव तर्फे राज्यस्तरीय तंत्रस्नेही शिक्षक पुरस्कार या पुरस्कारांचा त्यात समावेश आहे.राज्य मराठी विकास संस्था महाराष्ट्र राज्य तर्फे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय कथालेखन स्पर्धेत त्यांनी .विशेष प्राविण्य मिळवलेले आहे. शा या अनेक पुरस्कार प्राप्त व अनेक राज्यस्तरीय संमेलने गाजवलेल्या कवयित्रीच्या सुंदर कवितांचा आपण रसास्वाद घेऊ या.कवयित्रीची कोणाची तरी.. लाडकी बहीण ही कविता समाजातल्या अतिशय गंभीर प्रश्नावर भाष्य करणारी आहे. निर्भया प्रकरण किंवा कलकत्ता, महाराष्ट्र अनेक ठिकाणी स्त्री वर अत्याचार होत आहेत,यावर ती म्हणते,कोणाची तरी लाडकी बहीण आज निर्भया म्हणून गाजत आहे.व्यथा ऐकून तिच्या मृत्युची प्रत्येक स्त्री स्वतःच्या बाईपणावर लाजत आहे! तर तू चाल पुढे या कवितेत कवयित्रीनं स्त्रीला कितीही अडचणी आल्या तरी तू त्याची तमा न बाळगता पूढ चाल आणि स्वतःचं अस्तित्व सिद्ध कर असा मोलाचा संदेश दिला आहे. ती गळ्यातील मंगळसूत्राला कधीच बंधन म्हणून पहायचं नाही लग्न झालं म्हणून फक्त संसारातच अडकून रहायचं नाही ! मी एक आई आहे या कवितेत कवयित्री स्त्रीला स्वतःच्या गृहीणीनं स्वताला कमी समजायचं नाही तर तुझं शिक्षण काय म्हटले तर अनुभवात पीएचडी केलीय असं सांगायला सांगते, हेच बघा ना,कोणी विचारलं तुला, तुझं घरातील स्थान ? तर ठणकावून सांग माझ्याशिवाय हलत नाही पान! या ओळी स्त्रीचं घरातलं महत्व अधोरेखित करतात. मात्र कवयित्री नेहमी फक्त पुरुषंच चुकतात असं नाही या कवितेत पुरुषवर्गाची बाजू घेते, कधीकधी स्त्री पण कजाग असते, सारखी माहेरी पळते, मी म्हणून टिकले म्हणते, त्याला समजुन घेत नाही, पुरुषाला स्त्रीसारखे अश्रू पण ढाळता येत नाहीत. ती म्हणते, त्यालाही थोड़ा मोकळा श्वास आता मिळायला हवा प्रत्येक स्त्रीला पुरुष, कळायला हवा! छोट्या, छोट्या पण महत्वाच्या विषयांवर शब्दांची,आशयपूर्ण सुंदर बांधणी करून विषय फुलवण्याचं कसब कवयित्री मध्ये आहे.पदर या विषयावरची माझा सखा सोबती कविता याचे उत्तम उदाहरण आहे.ती मुळातून वाचण्यासारखी आहे, शेवटी मृत्युपर्यंत साथ पदराची शेवटी माहेराशी नाळ जोडतो खरंच सांगते नेसता साड़ी आत्मविश्वासहजारपटीनंवाढतो! असं सांगून पदराबरोबरच भारतीय संस्कृतीचंही गुणगान केलं आहे. तर अशा या कवितांचेआपण अवलोकन करून आस्वाद घेऊया.


काव्यारंभ
डॉ. रेखा अनिल ढगे

### कोणाचीतरी.... लाडकी बहीण..

कोणाचीतरी लाडकी बहीण
आज निर्भया म्हणून गाजत आहे
व्यथा ऐकून तिच्या मृत्युची
प्रत्येक स्त्री स्वतःच्या
बाईपणावर लाजत आहे
तिची चूक
काय असते सांगा
तिच्या समोर नेहमीचं का
अडचणींच्या रांगा ?
नव्हते तोकडे कपडे
सांगा कुठं होता मेकप
वसा घेतला होतो रुग्नसेवेचा
करायची ती चेकअप
तो शास्त्र विसरला
तिने शस्त्र घेऊन कसं चालतं
कोणीतरी गुपचूप
खोट्या प्रतिष्ठेला साद घालतं
ममताची ममता का
का जागृत होत नाही
एक स्त्री का दूसऱ्या स्त्रीला
समजून घेत नाही
रक्ताच्या थारोळ्यात
लेकीला पाहून
किती हळहळले
असतील आई-बाप
का सांगा उडत नाही
गुन्हेगाराच्या आईचा थरकाप ?
असो कोलकत्ता किंवा महाराष्ट्र
सांगा ती कुठं सुरक्षित
पुरुषांची मत्तेदारी म्हणून
नेहमीचं सावज म्हणून आरक्षित
संस्कारचं नाही उरले तर
शिवरायांसारखे प्रत्येक स्त्रीला
आई- बहीण कोण माननार?
तिचं दु:ख सांगा
कधी कोण जाणणार
म्हणून मुख्यमंत्री साहेब
खंबीर भाऊ आपण व्हायला हवं
कशी जगते तुमची बहीण
हे जवळून पहायला हवं

### माझा सखा सोबती...

पदर माझ्या साडीचा
खरचं माझा सखा सोबती
म्हणतो नेहमीचं कौतुकाने
तुझे हात किती राबती
सतत मागे-मागे
जसा पाठचा भाऊ
संकटातही म्हणतो
धीराने चल आपण पाहू
तोचं पदर खोचून मी
वाघिनीसारखी सरसावते
स्त्री म्हणून कर्तव्यपूर्तीसाठी
वाऱ्यासम धावते
अश्रू नेहमीचं माझे
माझ्या पदरात विरतात
कळून चूकते मग
लोक फक्त आनंदाचं हात
धरतात
खाद्यांवरती अन् डोक्यावरती
जेव्हा सजतो तो
बाईचा सालसपणा
म्हणून गाजतो तो
थकून-भागून आलेल्या
लेकराच्या गालावरती
मातृत्वाने फिरतो तो
सुख किती-किती
माझ्या आयुष्यात भरतो तो
घडी-घडी पदरातं माझ्या
आनंद जपते मी
खडतर प्रवास जीवनाचा
सहज कापते मी
मृत्युपर्यंत साथ याची
शेवटी माहेराशी नाळ जोडतो
खरचं सांगते नेसता साडी
आत्मविश्वास हजार पटीने
वाढतो

### मी एक आई आहे..!

आपण काय करता?
कोणी विचारले तुला
तर अभिमानाने सांगायचे
मी एक आई आहे.!
घरातील थकल्या-भागल्याची
माई आहे
शेजाऱ्याची मनमिळावू ताई
आहे
नवऱ्याचे आयुष्य फुलवणारी
जाई आहे
कोणी विचारले तुला
काय शिक्षण तुझे?
तर सांग अनुभवात पी.एच.
डी केलीयं
सासुरवास नावाची कठीण
परीक्षा दिलीयं
कोणी विचारले तुला
काय तुझ्या आवडी-निवडी?
सांगून टाकायचं
सुखी-संसार ही माझी आवड
कर्तव्यपूर्ती ही माझी निवड
कोणी विचारलं तुला
तुझं घरातील स्थान?
तर ठणकावून सांग
माझ्याशिवाय हलत नाही
पानमग कशाला हवायं मान
कोणी विचारलं तुला
थकतेसं का तु?
सांग अजिबात नाही
बाईच्या आयुष्यात घर-
संसाराशिवाय
उरते का काही !
कोणी विचारले तुला
पुढचे नियोजन काय?
तेव्हा असं सांगायचं
आईची आजी मी होणार
माझ्या घरातील सुख
वाढताना पाहणार
कोणी विचारेलं तुला
तुझा बँक बॅलन्स काय?
हसून सांगून टाकायचे
संसार नावाच्या बँकेत
आनंदाची ठेव आहे
माझ्यासाठी प्रत्येकाच्या
डोळ्यात
आपुलकीचा भाव आहे
कोणी विचारेलं तुला
जीवनाविषयी तक्रार काही
तेव्हा सांग अजिबात नाही
एक आई म्हणून वावरतेयं
आणखी काय हवं!
एकदाचं फक्त आई होऊन
पहावं

### तू चाल पुढे.....

तू चाल पुढे म्हणणारे
तुझ्या प्रत्येक पावलावर
तुला भेटतीलचं असं नाही
पण तु मात्र मागे वळून
आता कधीचं पहायचं नाही
फक्त चूल आणि मूल
या चाकोरीत अडकून रहायचं
नाही
तू असचं जिद्दीने
पुढे चालायला हवं
जिथ तुझं आस्तित्व नाही
तिथं लक्ष घालायला हवं
आयुष्याच्या बंधनात
सांग किती दिवस अडकून
रहायचं
कधी सांग तुझ्या मनात
वसलेल्या
तुझ्या आस्तित्वाला निरखून
पहायचं
वाटलं तुझ्या मनाला की
तू खळखळून हसत जा
कधी- कधी काम बाजूला
ठेवून
निवांत थोडसं बसत जा
गळ्यातील मंगळसूत्राला
कधीचं बंधन म्हणून पहायचं
नाही
लग्न झालं म्हणून फक्त
संसारातचं अडकून रहायचं
नाही
तुलाही हव्यात चार मैत्रिणी
हितगुज करायला
आयुष्याचा सुखद
आनंद आठवणींच्या
पिशवीत भरायला
वेगळं काहीतरी करताना
अनेक अडचणी येतील
बाहेरचे सोड घरचेसुध्दा
मांजरासारखे आडवे जातील
तेव्हा तुला सावित्रीसारखं
ठाम बनायचयं
सिंधूताईसारखं परक्यांना
आपलं मानायचयं
तू थोडं मोठ्याने हसलीसं
तरी समाजाला रुचत नाही
तू थोडं बिनधास्त वागलीसं
तरी समाजाला पचत नाही
तू कधीचं या समाजाची
तमा बाळगू नकोस
तुझ्या कर्तुत्वाला किती
उभारी
तू पायलट, कंडक्टर,आणि
आज लाईनवूमनही झालीसं
तू अनेक शिखरे पार
केलीसं
म्हणून..
तू चाल पुढे... म्हणताना
अभिमान वाटतो
तुझं आस्तित्व खोल
रुजताना
पाहताचं...
आनंदाने कंठ दाटतो

### नेहमी फक्त पुरुषचं... चुकतात असे नाही

नेहमी फक्त पुरुषचं
चुकतात असे नाही
फक्त म्हातारपणीचं
केस पिकतात असं नाही
कधी कधी
ती ही असते कजाग
त्याला कधी समजूनचं घेत नाही
संसारातील चढउतार
तिला कधी उमजून येत नाही
मी म्हणून टिकून राहिले
सारखं ती म्हणतं असते
आपल्या खोट्या आत्म
विश्वाराला
गर्वाने गुणत असते
थोडी कुरबुर झाली की
तिने माहेरी पळायचे
त्यांने कुठे जायचे
सांगा तिला कधी हे कळायचे
तिची नाती ती अगदी
आपुलकीने जपते
पण त्याला मात्र पोरक करते
त्याच्या हातात फक्त
आपल्या माणसांविषयी
हतबलता उरते
बोलून,रडून भांडे आपतून
तिने राग व्यक्त करायचा
पण त्याला कधीचं
अश्रू ढाळून चालत नाही
कारण त्यांच्यासारखी ठामपणे
संसाराला साद कोणी घालत
नाही
त्याच्यासाठी अनेक बंधने
त्याने डोळ्याच्या धाकात रहायचे
सगळं काही विसरुन पुन्हा
कुटुंबाचे सुख पहायचे
काही दिवसांनी
कदाचित असे होईन
स्त्री-प्रधान हा समाज होईल
त्याच्यावर होणारे
अत्याचार जग पाहिल
त्याला मिळेल आरक्षण
त्याच्या बाजून कायदे होतील
तेव्हा मात्र तिला
अपराधी भावनेने जगावे लागेल
पहिल्यासारखं पुव्हा नम्रतेने
वागावे लागेल
म्हणून अस वाटतं
त्यालाही थोडा मोकळा श्वास
आता मिळायला हवा
प्रत्येक स्त्रीला पुरुष
कळायला हवा



- आश्विनी पांडुरंग धाट
(कुलकर्णी), धाराशिव
मो.न.९९६०८३६९३१

# समाजभान जपणारा कार्यकर्ता डॉ. सिद्धेश्वर जाधव

**अत्यंत** खडतर परिस्थितीतून,संघर्ष करत, लढा देत ग्रामीण भागात आरोग्य, सामाजिक क्षेत्रात आपला आगळावेगळा ठसा उमटवत सामान्य रुग्णाचा मसिहा म्हणून ओळख निर्माण करणारा डॉक्टर म्हणजे डॉ. सिद्धेश्वर शाहूराज जाधव. डॉ .सिद्धेश्वर जाधव यांच्या सघर्षमय लढ्याचा लेखाजोखा घेणारा हा लेख. डॉ. सिद्धेश्वर जाधव यांचा जन्म सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षण जि. प. प्रा. शाळा चिखली (ता.धाराशिव) येथे झाले. ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण प्रसिद्ध प्रशाला गाधी विद्यालयात झाले. एस. एस. सी. बोर्ड परिक्षेत शाळेतील गुणवत्ता यादीत तो पास झाला. पुढे ११ वी, १२ वी बाहेर शहरात शिकत राहिला. १२ वीला सहज ला सहज लागला असता पण सघर्षाला येथूनच खरी सुरुवात झाली.इथे सघर्ष बाजूला ठेवून तो शिकत राहिला. त्याने १२ वी पास झाल्यानंतर बी. एच. एम. एस. ला प्रवेश घेतला.पुढच्या कालावधीत डॉक्टर झाला. त्याने ग्रामीण भागात सेवेला सुरुवात केली. पचक्रोशीतील खेड्यात मोटार सायकलवरुन जाऊन सेवा करु लागला. मी खेड्यातील लोकांची सेवा करेन ही खूणगाठ बाधून चिखली चौक ते राजुरी



रस्त्यावर निसर्गरम्य परिसरात तीन मजली टुमदार दवाखाना बाधला असून, दिवसरात्र अल्पदरात रुग्णाची सेवा करीत आहे. गर्दी खूपच असते. रुग्णसेवा करत त्यांनी मॉडर्न फार्माकोलॉजीमध्ये पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण केले तसेच कायद्याची पदवी पण पूर्ण केली.कोविडसारख्या महामारीमध्ये अल्पदरात स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अविरत सेवा सुरू ठेवणारे धाराशिव ग्रामीण भागातील ते डॉक्टर होते.सेवा करीत सामाजिक भान ठेवून छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, राजर्षी शाहू



डॉ. सिध्देश्वर जाधव

महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले संत तुकाराम या महामानवाच्या पुरोगामी, परिवर्तन विचाराचा वारसा चालवित आहे. दवाखान्याला जिजाऊ किल्नीक, असे नाव ठेवले आहे. विद्रोही सतकवी तुकाराम महाराज यांचे त्यांनी मदिर बाधले आहे. अनेक सामाजिक चळवळ, शेतकऱ्यांच्या लढ्याचे नेतृत्व करीत शासनदरबारी दोलन, लढे सुरू आहेत. गुणवत्ता विद्यार्थ्यांचा सत्कार, रक्तदान शिबीर, मोफत आरोग्य शिबिरे आदी सामाजिक उपक्रम राबवून समाजसेवा करीत आहेत. आरोग्य सेवेत पत्नीची खबीर साथ असल्याने डॉ. जाधव इथपर्यंत पोहचू शकले. शिक्षणाची त्यांनी कास सोडली नाही. नुकतीच आरोग्य क्षेत्रातील पदवी मिळवली आहे. रुग्णसेवेची १५ वर्ष त्यांनी नुकतीच पूर्ण केली. शेतकरी,शेतमजुराचा त्यांच्या लेकरांचा बालरोग तज्ज्ञ म्हणून ग्रामीण भागात जनमानसात त्यांनी ख्याती मिळविली.आणि सेवा अविरत चालू ठेवली.वाचन, मनन,चितन, निर्व्यसनी सामाजिक भान असलेले डॉ. सिद्धेश्वर जाधव यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन एखाद्या सामाजिक संस्थेने त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याची गरज आहे. त्यांच्या, आरोग्यसेवेस, सामाजिक कार्यास मनस्वी शुभेच्छा.


श्री सुभाष चव्हाण ( प्रसिद्ध रानकवी)
सेवानिवृत्त मुख्याध्यापक
गाधी विद्यालय चिखली. ता. धाराशिव.९६०४७४१५०९.

# समाधान कुठे शोधताय ?

**माणूस** हा अत्यंत लोभी आणि हव्यास असणारा प्राणी आहे.माणसाकडे जे आहे त्यात तो सुख समाधान मानत नाही.आणखी मिळविण्याच्या नादात जे हाती आहे त्याचा आनंद तो घेत नाही.त्यामुळे तो दु:खी कष्टी होतो.चिंतेत, विवंचनेत तो जीवनातील आनंद गमावून बसतो.कारण त्याचा हव्यास त्याचे चित्त अस्थिर करतो.अस्थिर चित्त माणसाला कधीच आनंद देत नाही. आज माणूस संपत्ती, प्रतिष्ठा आणि प्रसिद्धीच्या मागे धावतोय.बरं हे सगळं मिळूनही त्याचे मन तृप्त होत नाही.त्याला आणखी हवं असतं. हे आणखी मिळविताना त्याचे स्वास्थ्य हरवून बसते.म्हणजेच तो पुन्हा दु:खी होतो.या दु:खाच्या चक्रात तो अडकून पडतो.तथागत सांगतात 'हा हाडामासाचा देह नश्वर आहे.कधी ना कधी तो नष्ट होणार आहे.एकदा का देह नष्ट झाला की तुमचे या पृथ्वीतलावरील अस्तित्व संपणार आहे.त्यामुळे तुम्ही कुशल कर्म करुन आनंदी जगा.आनंदी जगण्यासाठी तुमचे चित्त शांत आणि समाधानी ठेवा. शांत चित्तच तुम्हाला आनंद देऊ शकते.'पण आज माणसाची भूक प्रचंड वाढली आहे.पैसा, संपत्ती मिळविण्यासाठी तो कधीकधी भ्रष्ट मार्गाचा तसेच अनितीचा वापर करतो.दुसऱ्याची संपत्ती मिळविण्यासाठी वेळप्रसंगी जीवावर उठतो. द्वेष,मत्सर,असूया,क्रोध,लोभ यामध्ये मानवप्राणी गुंतून पडल्यामुळे त्याला मानवी जन्म कशासाठी? खरं जगणं काय ? हे अजूनही न कळल्याने तो प्रचंड दु:खी आहे.ताणतणाव, भीती,दडपण याखाली तो आपले जीवन जगत आहे.कसे जगावे ? कुठे थांबावे? हे त्याला कळतच नाही.शेवटी एक दिवस असा येतो की या हव्यासाचा, हावरटपणाचा,लोभीपणाचा त्याला खूप मोठा फटका बसतो आणि तो दु:खाच्या खाईत लोटला जातो.रं तर माणसाच्या गरजा खूप कमी आहेत.मनात उत्पन्न होणारा हव्यास थांबला की माणूस समाधानी आणि आनंदी राहू शकतो. भौतिक साधनांमध्ये आनंद शोधणारा माणूस कधीच समाधानी राहू शकत नाही.कारण खरा आनंद कशात आहे हे कळलेले नसते.चित्त शुद्ध झाले की आनंदाचीप्राप्ती होती. तुम्ही शुद्ध चित्ताने एखाद्या तहानलेल्याची तहान शमवता, भुकेलेल्या वाटसरुच्या पोटाची भूक भागविता त्यावेळी तुम्हाला खऱ्या आनंदाची प्राप्ती होती. म्हणजेच तुमची कुशल कर्मे तुम्हाला खरा आनंद देतात. तर मनात उत्पन्न होणारा लोभ हा दु:ख देतो. जोपर्यंत माणसाच्या मनातील लोभ नष्ट होत नाही तोपर्यंत तो सुख, समाधान प्राप्त करु शकत नाही.


लक्ष्मण जगताप
बारामती

### जीवन जगावे चांगले

जगतात लोक जीवन कसेही
वागतात मनात आले तसेही
बोलतात शब्द न पारखता
व्यवहार वचनाला न जागता

जगतात लोक जीवन कसेही
करतात कामे मनात आले तसेही
चालतात जीवनवाट मनमानी
घालतात वाया वेळ अन् पाणी

जगतात लोक जीवन कसेही
चांगल्या लोकांची साथ असुनही
वाईट कर्म त्यांच्या ठायी
करतात खर्च पैसा अनाठायी

जगतात लोक जीवन कसेही
ठेवतात नावे चांगल्या लोकांनाही
हसतात कुत्सितपणे इतरांना
रडतात घाबरून संकटांना

जगतात लोक जीवन कसेही
असते माहीत त्यांना तरीही
सोडेनात हेका वाईट वागण्याचा
फायदा काय असल्या जगण्याचा

जीवन मिळालेले जगावे चांगले
चारित्र्य शुद्ध ते असावे आपले
जगणे आपले बावनकशी सोने
इतरांनाही वाटते ते हवेहवेसे

### मान आणि अपमान

वर्तन चांगले चारित्र्य सोने
कर्म चांगले थोडे बोलणे
तेव्हा मिळतो मान
वर्तन वाईट चारित्र्य वोखटे
बोलणे वाचाळ कर्म खोटे
तेव्हा होतो अपमान
नजर चांगली नियत शुद्ध
मदतीला हात पुढे येतो
तेव्हा मिळे मान सन्मान
नजर वासनांध नियत अशुद्ध
मदतीला हात आखडतो
तेव्हा होई अपमान
कष्ट करतो कष्टाचेच खातो
निर्व्यसनी जीवन जगतो
तेव्हा होतो मान सन्मान
भ्रष्टाचार करतो हरामाचे
खातोनशेत सदैव झिंगत
राहतोतेव्हा सदोदित अपमान
आईवडिलांचे बोल ऐकतो
उच्च शिक्षणाने सदाचारी
बनतोतेव्हा मिळतो मान
आईवडिलांना कमी लेखतो
अर्ध्यावर शिक्षण सोडतो
गावात होतो अपमान
समाजात व गावात रमतो
लोकहिताची कामे करतो
गावकरी करती सन्मान
कार्यकर्ता बनून पार्ट्या खातो
राजकारणाचे खोटे डाव खेळतो
निवडणुकीत होई अपमान

### हे खेळ मनाचे

हे खेळ मनाचे ज्याचे त्याचे
अगदी निरनिराळे
मन कोणाचे वात्सल्य प्रेमाचे
कोणाचे ते अगदी भोळे
हे खेळ मनाचे अनाचाराचे
कपट कारस्थानाचे
मन कोणाचे दुष्ट वासनांचे
कोणाचे ते मळकटलेले
हे खेळ मनाचे स्वार्थ दडलेले
भ्रष्टाचारी वृत्तीचे
मन कोणाचे भलतेच कपटी
पैशाला हपापलेल्या लोकांचे
हे खेळ मनाचे परोपकाराचे
मदतीला धावून जाण्याचे
मन कोणाचे कष्टात रमणारे
आपल्या वडिलांचे
हे खेळ मनाचे माणुसकीचे
कुटुंबव्यवस्था जपण्याचे
मन कोणाचे मायेने भरलेले
आपल्या लाडक्या आईचे
हे खेळ मनाचे खेळकर
हसरे
मैत्रीला जपण्याचे
मन कोणाचे पुस्तक खुले
आपल्या बहिण भावाचे
हे खेळ मनाचे तळमळीचे
निस्वार्थ कर्म करण्याचे
मन कोणाचे निर्मळ पाण्याचे
आपल्या आदर्श शिक्षकांचे

### बदलले ऋतूचक्र

ऋतू कोणता आहे काही
कळेना उन्हाळ्यात पाऊस
काही थांबेना
विजांचा कडकडाट थैमान
वाऱ्याचे दगावली मुकी जनावरे
अन् माणसे
गरीबांच्या लग्नाचा फज्जा झाला
लग्नाच्या वेळी मंडप उडून गेला
चिखलाने सगळीकडे राडा
झाला नवरीच्या बापाने हंबरडा
फोडलाउन्हाळ्यात पाऊस
धो धो पडतो पेरणीच्या वेळी
गुंगारा मारतो पावसाळ्यात
मग कडक उन्हाळा गायब
झाला बघा थंडीचा हिवाळा
बदलले ऋतूचक्र विचार करा
थोडा माणसाने पर्यावरणाचा
घात केला जागोजागी साचला
विषारी कचरा
सर्वत्र दिसतो प्लॅस्टिकचा
पसारा कारखाने सोडती
वायू विषारी रसायनांचा
वापर जणू पिचकारी सगळ्या
नद्या प्रदूषित झाल्या मानव
जातीला शाप देऊन गेल्या
माणसांनो आतातरी शहाणे
व्हा प्रदूषणाला थोडे नियंत्रित
ठेवापर्यावरणाला जीवापाड
जपू या ऋतु चक्राला सुरक्षित
ठेवू या

- बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट
ता.अहदपूर जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.

# गोविंदपूर येथे वीजतार तुटून दोन जनावरांचा मृत्यू



आरंभ मराठी | गोविंदपूर

कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील नामदेव उत्रेश्वर मुंडे यांच्या शेतातील गट नं.२४४ येथील कोट्यावर महावितरणच्या ११ केव्ही पोलवरील तार तुटुन एक गायीचे वासरू व एक गाभण म्हैस या दोन जनावरांचा जागीच मृत्यू झाला. खामसवाडी येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पी. बी. राऊत यांनी मृत जनावरांचे पंचनामा करून शेवविच्छादन केले.

# तुळजापूरच्या जुन्या बस स्थानकाला पहिल्याच पावसात लागली गळती

## आठ कोटी रुपये खर्च करूनही प्रवाशांचे हाल

### कामाचा दर्जा न तपासताच केले बस स्थानकाचे उद्घाटन





सूरज बागल | आरंभ मराठी

तुळजापूर –तुळजापूर येथे भाविकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या जुन्या बस स्थानकात बुधवारी (दि.२१) झालेल्या पावसात प्रवाशांची तारांबळ झालेली पाहायला मिळाली. या स्थानकात सगळ्याच बाजूने पाणी येत असल्याने प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागला. दरम्यान आठ कोटी रुपयाचा खर्च पाण्यात गेल्याची भावना प्रवाशी व्यक्त करत आहेत. घाईगडबडीत बस स्थानकाचे काम करून कामाचा दर्जा न तपासता उद्घाटन कशासाठी करण्यात आले असा सवाल विचारला जात आहे. याप्रकरणी दोषी असणाऱ्यांवर कडक कारवाई करावी अशी मागणी आता जोर धरत आहे.शहरातील येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता तुळजापूर येथील जुने बस स्थानक पाडून येथे नवीन बस स्थानक उभे करण्यात आले आहे. ३० एप्रिल रोजी परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते मोठ्या थाटात याचे उद्घाटन पार पडले. मात्र अर्धवट तसेच निकृष्ट दर्जाची कामे करून हे उद्घाटन करून घेण्यात आल्याचे दिसून येत आहे. दरम्यान बुधवारी शहरात मोठा पाऊस झाल्याने या बस स्थानकाचे पितळ उघडे पडलेले दिसून आले. स्थानकात सगळ्याच बाजूने पाणी येत असल्याने तेथे बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना व भाविकांना जागेवरच भिजत उभे राहावे लागले. ही स्थिती पाहून प्रवाशी व स्थानिक नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. जवळपास आठ कोटी रुपये खर्चा नंतरही निकृष्ट दर्जाचे बांधकाम झाल्याचे स्पष्ट होत असून याबाबत संबंधित ठेकेदारावर कारवाईची मागणी आता प्रवासी व नागरिक करू लागले आहेत.

### कामाचा दर्जा न तपासता उद्घाटन केले

या बस स्थानकाला सुरुवातीला ३ कोटी ६१ लाख इतका खर्च अपेक्षित होता. मात्र त्यानंतर यामध्ये वाढ करत हा खर्च एकूण ७ कोटी ९१ लाख इतका करण्यात आला आहे. मात्र तरी देखील संरक्षण भिंती तसेच इतर काही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याचे बोलले जात आहे. बस स्थानकाचे काम घाईगडबडीत करण्यात आले तसेच कामाचा दर्जा न तपासताच त्याचे उद्घाटन करण्यात आले आहे. परिवहन मंत्री हेच जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे याप्रकरणी जबाबदारी अधिकाऱ्यांवर आणि संबंधित ठेकेदाराला कडक कारवाई करावी अशी मागणी प्रवासी आणि तुळजापूरचे नागरिक करत आहेत.

### प्रशासनाने तेंव्हाच तक्रारीची दखल घेतली असती तर ही वेळ आली नसती

या बस स्थानकाच्या बांधकामास सुरुवातीपासूनच अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी व संघटनांनी विरोध करत आंदोलने केली होती. तसेच निवेदनाद्वारे देखील याबाबत संबंधित अधिकारी यांना माहिती दिली होती. मात्र याची कोणतीही दखल घेतली गेली नाही. बस स्थानकाचे काम सुरू असतानाच ज्या ज्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्याची दखल घेऊन योग्य प्रकारे कामाकडे लक्ष दिले असते तर आज बस स्थानकाची अशी अवस्था झाली नसती असेही बोलले जात आहे.

# ग्रामपंचायत सदस्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ

## धाराशिव तालुक्यातील ५४ ग्राम पंचायत सदस्यांना दिलासा

आरंभ मराठी | तेर

मुदतीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी धाराशिव तालुक्यातील ५४ ग्रामपंचायत सदस्यांना अपात्र ठरविले होते. परंतु, आता शासनाने जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी एक वर्षाची मुदतवाढ दिल्याने अपात्र झालेल्या सदस्यांना दिलासा मिळाला आहे. २०२२ मध्ये झालेल्या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत राखीव जागेवरून निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्य, सरपंच यांनी मुदतीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी धाराशिव तालुक्यातील ३ सरपंचासह ५४ ग्रामपंचायत सदस्यांना १३ मार्च २०२५ रोजी अपात्र ठरविले होते. परंतु , शासनाने नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या पुर्वी जात पडताळणी समितीकडे अर्ज सादर केला असेल किंवा ३० एप्रील २०२५ च्या आदेशाच्या दिनांकास संबंधित सदस्यांचा अर्ज जात पडताळणी समितीसमोर प्रलंबित आहे अशा सदस्यांना १२ महिन्याच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. शिवाय अपात्र ठरविण्यात आलेले सदस्य पुन्हा कामकाजात सहभाग होऊ शकतील असा अध्यादेश जारी केला आहे. धाराशिव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी संबंधित गावचे सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांना शासनाचा आदेश पत्राद्वारे सुचीत केला आहे. दिलासा मिळालेल्या ५४ ग्रामपंचायत सदस्यांमध्ये वाखरवाडी, कोल्हेगाव गोरेवाडी, ढोकी, तडवळा,जवळा,( दु) उमरेगव्हाण, केशेगाव, तोरंबा, रूईभर, अंबेहोळ, देवळाली टाकळी ( बे)कनगरा, धारूर, बामणी, करजखेडा, खानापूर, कामेगाव, समुद्रवाणी, मेंढा,जुनोनी,शेकापूर,येडशी,किणी,तेर,कोंड,येवती, इर्ला,उपळा (मा ),शिंगोली,अंबेजवळगा या गावातील अपात्र ग्राम पंचायत सदस्यांना शासनाच्या निर्णयामुळे दिलासा मिळाला आहे.

# वंचित बहुजन आघाडी परंडा तालुक्याच्या नूतन कार्यकारिणी निवडीसाठी २५ मे रोजी होणार मुलाखती

आरंभ मराठी | धाराशिव




धाराशिव येथे वंचित बहुजन आघाडी पक्षाचा कार्यकर्ता पदाधिकारी संवाद मेळावा मंगळवारी (दि.२०) शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगरपरिषद नाट्यगृहा मध्ये पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थीतीत संपन्न झाला. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या अनुषंगाने पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. वंचित बहुजन आघाडी परंडा तालुका नवीन कार्यकारणी निवड करण्यासाठी निवड समिती प्रमुख म्हणून धनंजय सोनटक्के, जिल्हा महासचिव यांना ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी आदेशित करून जबाबदारी दिली. या प्रसंगी मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल, निरीक्षक अविनाश भोसीकर, फुले आंबेडकर विद्वत सभा राज्यसमन्वयक प्रा.डॉ.शहाजी चंदनशिवे, ॲड.प्रणित डिकले, बि.डि.शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अनुराधा लोखंडे, सुधिर वाघमारे, मोहनदादा बनसोडे, उत्तरेश्वर ठवरे, आण्णा काळे, किरण बनसोडे, इर्शाद बागवान,गणेश सरवदे,भाऊसाहेब आंदळकर,विकास बनसोडे,नासिर शेख, नामदेव वाघमारे उपस्थित होते. वंचित बहुजन आघाडी परंडा तालुका कार्यकारणी निवड करण्यासाठी प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशानुसार रविवार दिनांक–२५ मे रोजी परंडा येथे निवड समितीच्या वतीने मुलाखती होणार आहेत.

# शासनमान्य विद्युत ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी विशाल शिंगाडे







आरंभ मराठी | धाराशिव

शासनमान्य विद्युत ठेकेदार संघटनेच्या अध्यक्षपदी विशाल शिंगाडे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे जिल्हाभरातील विद्युत ठेकेदार व कामगारांमधून स्वागत होत आहे. धाराशिव येथे बुधवारी झालेल्या बैठकीमध्ये शासनमान्य विद्युत ठेकेदार यांची नवीन कार्यकारणी घोषीत करण्यात आली. नूतन कार्यकारिणीत अध्यक्षपदी विशाल शिंगाडे, उपाध्यक्ष शंकर कोळगे, कार्याध्यक्ष नानासाहेब देवकर, सचिव राजाभाऊ पांचाळ, सहसचिव संदीप रोकडे, कोषाध्यक्ष अतुल टेकाळे, तुळजापूर विभाग प्रमुख – बापूसाहेब घोंगते, सोशल मीडिया प्रमुख शुभम कुंभार, लोहारा/उमरगा तालुकाध्यक्ष महेश जाधव, भूम तालुकाध्यक्ष परमेश्वर नाईकनवरे, कळंब तालुकाध्यक्ष विशाल जाधवर आणि वाशी तालुकाध्यक्षपदी किशोर ढेंगळे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या निवडीचे सर्व विद्युत ठेकेदार व सदस्यांनी स्वागत केले आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता कक्षा मार्फत रक्तदान शिबिर संपन्न

आरंभ मराठी | धाराशिव




जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय रक्तपेढी, जिल्हा रुग्णालयात रक्तदान शिबिर सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आले होते, सदर शिबिराचे उद्घाटन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉक्टर शैलेंद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख डॉक्टर सुरज मोटे यांच्यासह भाजप जिल्हाध्यक्ष श्री. दत्ताभाऊ कुलकर्णी, उपनगराध्यक्ष श्री.अभय इंगळे, भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री.राजसिंह राजेनिंबाळकर, श्री.अभिजीत काकडे, श्री.सुजित साळुंखे, श्री.दाजी आप्पा पवार, श्री.प्रसाद मुंडे, श्री.समर्थ हजगुडे, जिल्हा रक्तपेढीचे डॉक्टर तांदळे, डॉक्टर बांगर, डॉक्टर सोनाली, श्री.विठ्ठल कांबळे, श्री.आकाश राऊत, श्री.तिरुपती केंद्रे, श्री.रविराज गंभीरे, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे समाजसेवाअधीक्षक मनेष खंडागळे आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आज विविध कार्यक्रमांसाठी कोल्हापूर दौऱ्यावर

आरंभ मराठी |कोल्हापूर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार विविध विकासकामांच्या उदघाटननिमित्त कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. दोघांचेही कार्यक्रम मात्र वेगवेगळे आहेत. इचलकरंजी येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते विविध विकासकामांचे उदघाटन आणि लोकार्पण होणार आहे. सकाळी ११ वाजता त्यांच्या हस्ते शहापूर पोलिस ठाण्याच्या इमारतीचे उदघाटन होईल. त्याचठिकाणी शहरातील विविध विकासकामांचे उदघाटन आणि लोकार्पण ऑनलाईन पद्धतीने करण्यात येईल. त्यानंतर के.ए.टी.पी. ग्राऊंड या ठिकाणी विकासपर्व जाहीर सभा होईल. सभेमध्ये लाभार्थ्यांना मंजूर पत्रांचे वाटप आणि बांधकाम कामगारांना गृहोपयोगी संचांचे वाटप मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येईल.सभेस उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री तथा कोल्हापूर जिल्हा सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, खासदार धनंजय महाडिक, आमदार अमल महाडिक, प्रकाश आवाडे, सुरेश हाळवणकर आदी उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, पहिल्यांदाच इचलकरंजी दौऱ्यावर येणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीस यांच्या स्वागताची जय्यत तयारी आमदार राहुल आवाडे यांनीकेली आहे. आजच सकाळी ९.४५ वाजता कोल्हापूर विमानतळ येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आगमन होईल. सकाळी ११ वाजता विश्वनाथराव पाटील मुरगूड सहकारी बँक लि., मुरगूड या बँकेच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२.३० वाजता बिद्री (मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर येथे आगमन व श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना मर्या., बिद्री–इथेनॉल निर्मिती प्रकल्प उद्घाटन समारंभास उपस्थिती. दुपारी तीन वाजता प. बा. पाटील शिक्षण संकुल, मुदाळ, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर येथे आगमन. दुपारी तीन वाजता कार्यकर्ता मेळावा. दुपारी ४.३० वाजता मोटारीने प्रयाण. सायंकाळी ५.२० वाजता, नागाव फाटा, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे सिटीझन सिंडीकेट या संस्थेच्या नूतन कार्यालयाच्या उद्घाटन समारंभास

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेतील अनुदानात वाढ वयोमर्यादा केली रद्द

आरंभ मराठी |तुळजापूर

बेरोजगारांना व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य देणाऱ्या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात राज्य सरकारने महत्त्वाचे बदल केले असून, याबाबतचा सुधारीत शासन निर्णय बुधवारी जारी करण्यात आला आहे. या योजनेत सेवा उद्योग,कृषी पूरक व्यवसाय,कृषीवर आधारित उद्योग, ई–वाहतूक व त्यावर आधारित व्यवसाय, ग्रॅण्डवर आधारित विक्री केंद्रे,फिरते खाद्यान्न केंद्र,कुक्कुट पालन,अंडी उबवणी, मधुमक्षिकापालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, हॉटेल/ढाबा व्यवसाय, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रीडा, मासेमारी व बोटींग व्यवसाय समाविष्ट करण्यात आले आहेत. पूर्वी लाभार्थ्यांसाठी वयोमर्यादा अनुसूचित जाती–जमतींसाठी ५० वर्षे आणि इतर प्रवर्गासाठी ४५ वर्षे होती, ती आता पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. प्रकल्पांच्या किमतीसंबंधी मर्यादाही वाढवण्यात आल्या असून, सेवा व कृषी पूरक उद्योगांसाठी ५० लाख रुपये,तर उत्पादन उद्योगांसाठी १ कोटी रुपये इतकी करण्यात आली आहे. अनुदानातही वाढ करण्यात आली असून, अनुसूचित जाती–जमातींसाठी सेवा उद्योगांमध्ये शहरी भागात २५% (कमाल ५ लाख),ग्रामीण भागात ३५% (कमाल ७ लाख) अनुदान दिले जाईल. उत्पादन उद्योगांसाठी हे अनुक्रमे २५% (कमाल १२.५० लाख) आणि ३५% (कमाल १७.५० लाख) असेल.इतर प्रवर्गासाठीही अनुदान शहरी व ग्रामीण भागातया टक्केवारीनुसार देण्यात येईल. या योजनेत सहभागी होणाऱ्या लाभार्थ्यांना सेवा उद्योग व कृषी पूरक उद्योगासाठी एक आठवडा, तर उत्पादन उद्योगासाठी दोन आठवड्यांचे निवासी किंवा ऑनलाईन उद्योजकीय प्रशिक्षण अनिवार्य आहे.यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या अर्जदारांनाच कर्ज व अनुदान मिळणार आहे.प्रशिक्षणाचीपद्धतवकेंद्रनिवडण्याचीमुभाआहे.

Chief Minister Employment Generation Programme

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम
MAHA-CMEGP.GOV.IN

# राजकुमार मेंढेकर राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित



आरंभ मराठी | तेर

राष्ट्रवादी शिक्षक संघटनेचे धाराशिव जिल्हा सरचिटणीस राजकुमार मेंढेकर यांना एकता सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शिक्षकरत्न पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले.२० मे २०२५ रोजी मुंबई पत्रकार भवन मुंबई येथे सन्मापूर्वक त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावर्षी विविध गुणवंतात धाराशिव जिल्ह्यातील राजकुमार मेंढेकर यांना राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरण कार्यक्रमास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, माजी आमदार रामराव वडकुते, सिनेअभिनेत्री उषा नाडकर्णी, अभिनेता अलिखान उपस्थित होते.

# भूम शहरवासीयांच्या वतीने तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## ऑपरेशन सिंदूरच्या शौर्याचा सन्मान

आरंभ मराठी |भूम

देशातील भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवल्याच्या निमित्ताने शूर सैनिकांचे अभिनंदन करण्यासाठी व ऑपरेशन दरम्यान शहीद झालेल्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी भूम शहरात गुरुवारी दि.२२) भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी अनेकांनी आपल्या भावना व्यक्त करत पाकिस्तान विरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला.

गुरुवारी शहरातील सजग नागरिकांनी भव्य अशी तिरंगा रॅली काढून पाकिस्तान विरुद्ध राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या पराक्रमाचे कौतुक केले. विंग कमांडर व्योमिका सिंह व कर्नल सोफिया कुरेशी या धाडसी महिलांचं यावेळी कौतुक करण्यात आले. या तिरंगा रॅलीच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्यामध्ये अतिरेक्यांच्या हल्ल्यात बळी गेलेल्या भारतीय नागरिकांना व ऑपरेशन सिंदूर राबवत असताना जे भारतीय सैनिक शहीद झाले त्यांना श्रद्धांजली अर्पण




करण्यात आली. यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसानच्या घोषणेने परिसर दुमदुमून गेला होता. तिरंगा रॅलीमध्ये शहरातील माजी नगराध्यक्ष विजयसिंहराजे थोरात, भाजपाचे तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर, माजी तालुका अध्यक्ष म हादेव वडेकर, शहराध्यक्ष बाबासाहेब वीर, काँग्रेसचे सेवादल जिल्हाध्यक्ष विलास शाळू, माजी सैनिक तालुका अध्यक्ष हेमंत देशमुख, उबाठा शिवसेना तालुका प्रमुख अनिल शेंडगे, सचिन बारगजे, सुब्राव शिंदे, प्रदिप साठे, मुकूंद वाघमारे यांच्यासह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध अकॅडमी, शाळा, महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही रॅली भूम नगर पालिका, गांधी चौक, बागवान गल्ली, बाजार रोड, लक्ष्मी रोड मार्गाने गोलाई चौक येथे आली. या ठिकाणी रॅलीचा समारोप माजी सैनिकांना गुलाब पुष्प देऊन व राष्ट्रगीताने करण्यात आला.

# कोल्हापूरचे नूतन जिल्हा पोलिसप्रमुख योगेश गुप्ता महेंद्र पंडित यांची ठाणे शहर उपायुक्तपदी बदली

आरंभ मराठी | कोल्हापूर



कोल्हापूरचे नूतन जिल्हा पोलिस प्रमुख म्हणून योगेश गुप्ता यांची नियुक्ती झाली आहे, तर विद्यमान पोलिसप्रमुख महेंद्र पंडित यांची ठाणे शहर उपायुक्तपदी बदली झाली आहे. गुप्ता सध्या हैदराबाद येथील प्रशिक्षणात असून लवकरच ते कोल्हापूरचा पदभार स्वीकारतील. राज्यातील २२ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश गृह विभागाने आज जारी केला.पोलिसप्रमुख महेंद्र पंडित यांनी मे २०२३ मध्ये कोल्हापूरचा कार्यभार सांभाळला होता. गेल्या दोन वर्षांत लोकसभा, विधानसभा निवडणुका त्यांच्या अधिपत्याखाली व्यवस्थित पार पडल्या. शहरातील जातीय दंगलीसह विशाळगड येथे झालेल्या दंगलीवेळी त्यांनी मोठ्या कौशल्याने परिस्थिती हाताळली.

# धाराशिवमध्ये भव्य तिरंगा रॅली, शिवसैनिकांसह महिला,वारकरी,विद्यार्थ्यांचा सहभाग

आरंभ मराठी | धाराशिव








पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी अत्यंत क्रूर पद्धतीने देशबांधवांनामारल्यानंतरभारत सरकारने ऑपरेशन सिन्दुर राबवून अतिरेक्यांना तसेच पाकिस्तानला धडा शिकवला. ऑपरेशन सिन्दुरचा सन्मान आणि गौरव करत देशभर सर्वत्र तिरंगा रॅली काढण्यात येत आहे.त्याचाच भाग म्हणून धाराशिव शहरात गुरुवारी शिवसेनेच्या पुढाकारातून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.यामध्ये शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह महिला,वारकरी, विद्यार्थ्यांचा सहभाग होता.शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, पालकमंत्री ना. प्रतापराव सरनाईक यांच्या आदेशाने शिवसेनेतर्फे ही भव्य तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली होती.शिवसेना जिल्हा सहसंपर्कप्रमुख भगवान देवकते, जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, जिल्हा संघटक सुधीर पाटील, जिल्हाप्रमुख मोहन पनूरे यांच्या नेतृत्वात ही रॅली काढण्यात आली. रॅलीची सुरुवात राष्ट्रमाता जिजाऊ चौक येथून करण्यात आली. श्रीपतराव भोसले हायस्कूल, आरपी कॉलेज, छत्रपती संभाजी महाराज चौक, संत गाडगेबाबा महाराज चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे ही रॅली विसर्जित करण्यात आली.या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी केलेल्या भारतीय जवानांच्या वेशभूषा सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. नागरिकांच्या हातात असलेले तिरंगा ध्वज, देशभक्तीपर गाणी, वारकरी गीत यामुळे अवघे शहर दणाणून गेले. भोसले हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी भारत मातेसह भारतीय जवानांच्या वेशभूषेत रॅलीत सहभाग नोंदवला.या रॅलीमध्ये शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह महिला, शाळा व महाविद्यालयाचे विद्यार्थी, वारकरी, माजी सैनिक, देशाभिमानी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## उमरगा पोलीस निरीक्षक कार्यालयाचा सन्मान; १०० दिवसांच्या सुधारणा अभियानात विभागात प्रथम क्रमांक



आरंभ मराठी | उमरगा

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात उमरगा पोलीस निरीक्षक कार्यालयाने छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम क्रमांक पटकावत गौरवाची नोंद केली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल भाजपा उमरगा शहर मंडळाच्या वतीने पोलीस निरीक्षक कार्यालयाचा गुरुवारी (ता.२२) रोजी सत्कार करून गौरव करण्यात आला. या यशामध्ये मोलाचा वाटा उचलणाऱ्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत भराते आणि गजानन पुजारवड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वामुळे आणि कर्तव्यनिष्ठेच्या जोरावर उमरगा पोलीस स्टेशनने हे यश संपादन केले आहे. सत्कार समारंभास भाजपा उमरगा शहर मंडळाचे अध्यक्ष ॲड. साईराज टाचले, ज्येष्ठ नेते डॉ. कपिल महाजन, जगदीश जाखोटिया, संतोष वकारे, समर्थ दंडगे, स्वप्नील बदोले, यशवंत कोथींबरे आदी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते. पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांचे नेतृत्व, तसेच सीमावर्ती भागातील पोलीस विभागाचे सुशासन, शिस्तबद्धता आणि कार्यक्षमतेचे प्रतिक ठरत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. उमरग्याच्या पोलीस दलाने दाखवलेली ही प्रगती भविष्यातील कार्यासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.

## उमरग्यात महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात काँग्रेस आक्रमक; महावितरणच्या अभियंत्यांचा उपहासात्मक सत्कार

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा शहरात मागील आठ ते दहा दिवसांपासून सुरू असलेल्या वीज लपंडावाच्या समस्येने नागरिक हैराण झाले असून, या प्रश्नासंदर्भात महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. काँग्रेसचे युवा नेते आश्लेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या शिष्टमंडळाने महावितरणच्या कार्यालयात मंगळवारी (ता.२०) धडक दिली. यावेळी मुख्य अभियंता गैरहजर असल्याने, उपस्थित अभियंता मोरे यांना शिष्टमंडळाने निवेदन देत लवकरात लवकर वीज लपंडावाच्या समस्येचे निराकरण करण्यात यावे, अशी मागणी केली. या निवेदनाच्या माध्यमातून विविध मागण्या करण्यात आल्या. या प्रसंगी अभियंता मोरे यांचा काँग्रेस कार्यकर्त्यांनी उपहासात्मक सत्कार करून आपला संताप व्यक्त केला.शिष्टमंडळात काँग्रेसचे नेते नानाराव भोसले, उमरगा तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष अर्जुन बिराजदार, जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस विजय वाघमारे, युवक काँग्रेस धाराशिवचे जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब गायकवाड, काँग्रेस शहराध्यक्ष विजय दळगडे, ॲड. पोद्दार, बाबा मस्के, तालुका उपाध्यक्ष गुरव, काँग्रेसचे माजी नगरसेवक राहुल सरपे, युवक काँग्रेस शहराध्यक्ष इनामदार, प्रकाश चव्हाण, निजामभाई व्हंताळे, विशाल काणेकर, जालिंदर सोनटक्के, जिवन सरपे आदींसह शहरातील अनेक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेसच्या या आंदोलनामुळे महावितरणच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

## प्रज्ञा पवार, प्राजक्ता हनमघर यांच्यासह शुभदा देशमुख यांना दमसाचे पुरस्कार

आरंभ मराठी | कोल्हापूर

येथील दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्या वतीने यंदापासून जनाबाई, सावित्रीमाई आणि कोयनामाई असे तीन पुरस्कार सुरू करण्यात आले असून त्यासाठी अनुक्रमे प्रज्ञा दया पवार, शुभदा देशमुख आणि प्राजक्ता हनमघर यांची निवड करण्यात आली आहे. तिन्ही पुरस्कारांचे स्वरुप प्रत्येकी २५ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे आहे. पुरस्कार प्रदान समारंभ ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते २४ मे रोजी सकाळी दहा वाजता शाहू स्मारक भवन येथे होणार आहे.सातारा येथील कवयित्री प्रा. रामकली पावसकर यांच्यामार्फत हे पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यांच्या वतीने आई कमल मनोहर कोपर्डे यांच्या स्मरणार्थ कवयित्रीसाठी जनाबाई पुरस्कार आहे. त्यासाठी प्रज्ञा दया पवार (ठाणे) यांच्या 'हिल्लोळ हरवून आतबाहेरचा' या कवितासंग्रहाची निवड करण्यात आली. त्यासाठी परीक्षक म्हणून ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे यांनी काम पाहिले. सामाजिक क्षेत्रात काम करणा-या महिला कार्यकर्त्यासाठी देण्यात येणा-या सावित्रीमाई पुरस्कारासाठी शुभदा देशमुख (गडचिरोली) यांची निवड करण्यात आली. 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी' या संस्थेमार्फत त्या गेली चाळीस वर्षे स्त्रियांच्या सबलीकरणासाठी काम करतात. स्त्री कलावंतासाठी देण्यात येणा-या कोयनामाई पुरस्कारासाठी अभिनेत्री प्राजक्ता हनमघर यांची निवड करण्यात आली. 'कॉमेडीची बुलेट ट्रेन' या कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकप्रिय झालेल्या प्राजक्ता यांनी धिंगाणा, धुरळा, गोष्ट एका पैठणीची, बस्ता, पाणीपुरी, आता थांबायचं नाय अशा विविध चित्रपटांतून भूमिका केल्या आहेत. मराठी साहित्य तसेच विविध चळवळींशी जोडून घेणाऱ्या प्राजक्ता हनमघर यांना आजच्या काळात ठाम भूमिका घेणाऱ्या कलावंत म्हणून ओळखले जाते

## अनुसूचित जाती व नवबौद्ध बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी २५ जूनपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौद्ध स्वयंसहायता बचत गटांसाठी मिनी ट्रॅक्टर व त्याचे उपसाधने पुरवठा करण्याची योजना सन २०१७ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २०२५ -२६ साठी धाराशिव जिल्ह्यातील इच्छुक बचत गटांनी २६ मे ते २५ जून २०२५ या कालावधीत :/ http://mto.mahasamajkalyan.in/.. या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. ऑनलाईन अर्जाची एक प्रिंट व आवश्यक कागदपत्रांची सत्यप्रत १० जुलै २०२५ पर्यंत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय,धाराशिव येथे सादर करणे आवश्यक आहे,असे बी.जी. अरवत, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, धाराशिव यांनी कळविले आहे.

## कोल्हापुरात दिवसभर पावसाने शहरवासीयांची उडाली दैना

आरंभ मराठी | कोल्हापूर

कोल्हापूर शहरात आज सकाळी दहाच्या सुमारास सुरू झालेल्या पावसाने अजूनही उसंत घेतली नाही मात्र अवेळीच्या पावसाने शहरवासीयांची मात्र दैना उडाली आहे.गेल्या दोन दिवसांपासून शहरसह जिल्ह्यात पावसाने झोडपून काढले आहे. त्यामुळे सखल भागात पाणी साचण्याबरोबर काही घरांतही पाणी गेले, तर वादळाने कित्येक ठिकाणी झाडे मोडल्याने वीजपुरवठा विस्कळित झाला होता.दरम्यान, आज सकाळी ढगाळ वातावरणाने दिवसाची सुरवात झाली. साधारण दहाच्या सुमारास पावसाला सुरवात होऊन तो दिवसभर पडला. सायंकाळी मोठ्या सरी आल्याने रस्त्यावरील विक्रेत्यांचे तारांबळ तर उडालीच शिवाय शाळांना सुट्ट्या असल्याने देवदर्शनासह पर्यटनाला आलेल्या नागरिकांनाही पावसाचा फटका बसला. पावसाने आजही सखल भागात पाणी साचल्याने पूर्ण शहरात वाहतूक अस्ताव्यस्त झाली. मध्यवर्ती बसस्थानक परिसर, लक्ष्मीपुरी, व्हीनस कॉर्नर येथे पाणी साचून होते. परीख पुलाखाली गुडघाभर पाणी साचल्याने तेथून होणाऱ्या वाहतुकीवर परिणाम झाला. हा मॉन्सूनपूर्व पाऊस आहे. उपसागरात निर्माण झालेल्या शक्ती वादळामुळे अजून दोन ते तीन दिवस पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पुढील आठवड्यातही एका वादळाचे संकेत असल्याने आणखी पाऊस होण्याची शक्यता आहे. कोल्हापुरात मॉन्सून दहा जूननंतर सक्रिय होणार आहे. यंदा १०० टक्के पावसाचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला असला तरी उन्हाळ्यातील पावसाने नागरिक मात्र त्रस्त झाले आहेत

## जवळा नि: जवळा येथे सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस



परंडा- तालुक्यात अवकाळी पाऊस जवळा -परंडा तालुक्यातील जवळा (नि.) परिसरात जोरदार अवकाळी पाऊस झाला.या पावसाने शिवारात पाणीच पाणी झाले होते. सायंकाळी सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार मुसळधार पावसाला सुरुवात झाली.यावेळी शेतकरी आपली पूर्वनियोजित शेतीची कामे करत होता.यावेळी अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची धावपळ दिसून आली. शेतकरी आपल्या ट्रॅक्टरसह बैलजोडीच्या साह्याने नांगरणी, मोगडणी खर्डा ,पाळीची कामे मोठ्या उत्साहाने करत आहेत.याप्रसंगी शेतातील ताली नांगरटीत पाणी साचले आहे.

## मंगलाष्टका रिटर्न्स' चित्रपट आज प्रदर्शित

आरंभ मराठी | कोल्हापूर




आपल्याकडे थाटामात लग्न करण्याची पद्धत आहे. आजवर अनेक चित्रपटांतून नायक-नायिकेचा लग्न करण्यासाठीचा संघर्ष दाखवण्यात आला आहे. मात्र, थाटामाटात घटस्फोट घेण्याची धमाल मनोरंजक गोष्ट मंगलाष्टका रिटर्न्स या चित्रपटात पाहायला मिळणार असून, उत्तम स्टारकास्ट असलेला हा चित्रपट उद्या, २३ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. लट प्रेमाची उलट गोष्ट' ही अनोखी टॅगलाइन असलेल्या 'मंगलाष्टका रिटर्न्स' या चित्रपटाचा धमाल ट्रेलर लाँच करण्यात आला आहे. वीरकुमार शहा यांनी निर्मिती केलेल्या मंगलाष्टका रिटर्न्स या चित्रपटाचे दिग्दर्शन योगेश पांडुरंग भोसले यांनी केलं आहे. डॉ. भालचंद्र यांनी कथा आणि संवादलेखन, पी. शंकरम यांनी संगीत दिग्दर्शन, विकास सिंह यांनी छायांकन, एस. विक्रमन यांनी संकलनाची जबाबदारी निभावली आहे. चित्रपटात वृषभ शाह, शीतल अहिरराव ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे. त्यांच्यासह प्रसाद ओक, आनंद इंगळे, सक्षम कुलकर्णी, सोनल पवार, कमलेश सावंत, सुनील गोडबोले, प्रसन्न केतकर, प्राजक्ता नवले, भक्ती चव्हाण, शीतल ओसवाल, श्वेता खरात, समीर पौलस्ते यांच्याही भूमिका आहेत. नायक-नायिकेचा लग्न करण्यासाठीचा संघर्ष अनेक चित्रपटांतून पाहायला मिळाला असला, तरी सेलिब्रेशन करून घटस्फोट घेण्याची वेगळीच कल्पना मंगलाष्टका रिटर्न्स या चित्रपटात आहे. म्हणूनच सुलट प्रेमाची उलट गोष्ट ही टॅगलाइन या चित्रपटाला नेमकी लागू पडते. घटस्फोट घेण्यापर्यंतच्या या गोष्टीत अनेक ट्विस्ट अँड टर्न्स आहेत, त्याला गाणी, विनोदाची फोडणीही देण्यात आली आहे. त्यामुळे हा चित्रपट पुरेपूर मनोरंजन करणार हे ट्रेलरमधूनच दिसून येत आहे.

# मेकॅनिकल इंजिनियरिंगकडे वाढला विद्यार्थ्यांचा कल

## तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाने आयोजित केलेल्या एक्सपर्ट टॉकमध्ये तज्ञांचा सूर

आरंभ मराठी | धाराशिव



सद्य परिस्थितीत मेकॅनिकल इंजिनिअरिंगची मागणी पाहता यावर्षीपासून बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा इंजिनिअरिंगच्या या शाखेकडे कल वाढलेला दिसत आहे. इंजीनियरिंग शाखेमध्ये विविध ब्रँच मध्ये मुलांचा उत्साह दिसत आहे. सध्याचे आधुनिक युग पाहता विद्यार्थ्यांना नवनवीन कल्पनांना वाव देणाऱ्या शाखा हव्या असतात. महाविद्यालये नॅशनल आणि मल्टिनॅशनल कंपन्यांसाठी परिपूर्ण विद्यार्थी पाठवत असतात. कोरोना काळानंतर ज्या कंपन्या फक्त विशेष इंजिनिअरची मागणी करत होते; त्या आता मेकॅनिकल इंजिनियर आवश्यक आहे असे सांगतात. नुकतीच तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय धाराशिव येथे यश ग्रुप ऑफ कंपनीचे एच आर नितीन बेद्रे यांनी मेकॅनिकल विभागाला भेट दिली त्या वेळी ते बोलत होते. त्यांनी मेकॅनिकल च्या विद्यार्थ्यांसाठी पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे एक एक्सपर्ट टॉक ही घेतला. त्यामध्ये त्यांनी यश इंडस्ट्रीच्या आळणी फाटा, चाकण व पुणे येथे असणाऱ्या युनिटची माहिती दिली. त्यादरम्यान त्यांनी औद्योगिक क्षेत्रात असणारी मेकॅनिकल ची गरज विशद केली. याचाच एक भाग म्हणून त्यांनी त्यांच्या कंपनीमध्ये सरळ सेवा भरती मध्ये मेकॅनिकल इंजिनियर ची आवश्यकता असल्याचे सांगितले. मेकॅनिकलचा विद्यार्थी हा एखादा सॉफ्टवेअर करून सॉफ्टवेअर इंजिनियर च्या तोडीस तोड होतो; म्हणून विविध कंपन्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनियरची अत्यंत आवश्यकता असल्याचे सांगितले. याच एक्सपर्ट टॉक दरम्यान बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. माने म्हणाले की औद्योगिक क्षेत्रामध्ये सध्या मेकॅनिकल इंजिनियर ची चलती आहे. त्याचा विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा. विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या सॉफ्टवेअरची व्यवस्था मुंबई पुणे न जाता महाविद्यालयात मध्येच करण्यात आलेली आहे. ''मेक इन इंडिया'' सारख्या सरकारी उपक्रमांमुळे मॅन्युफॅक्चरिंग सेक्टरला चालना मिळाली आहे, ज्यामुळे या क्षेत्रात नोकऱ्यांच्या संधी वाढल्या असल्याचे प्राचार्य माने यांनी सांगितले. कार्यक्रमादरम्यान बोलताना अकॅडमी डीन व मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. डी. डी. दाते यांनी कॉलेज राबवत असलेल्या मेकॅनिकल विभागातील विविध कोर्सेस ची माहिती दिली. या कार्यक्रमाचे आयोजन विभागाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सदस्य प्रा.आर. ए . दंडनाईक यांनी केले व त्यांना सहकार्य प्रा. एस. पी. बिरादार यांनी केले.

## तुळजापूर शहरातील किसान चौक ते पावणारा गणपती या रस्त्याचे रुंदीकरण करा: नगर विकास प्रधान सचिवांना निवेदन

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील अत्यंत महत्त्वाचा असणारा किसान चौक ते पावणारा गणपती या रस्त्याचे काम गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून रखडलेले आहे. याबाबतचा प्रस्ताव मंत्रालयात आहे असे सांगण्यात येत असल्याने यावर तात्काळ निर्णय घेण्याची मागणी माजी नगरसेवक सुनील रोचकरी यांनी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे . याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता किसान चौक व पावणारा गणपती पर्यंतचा रस्ता गेल्या अनेक वर्षापासून मंजूर आहे. याबाबत अनेकदा तारीख वर तारीख मिळताना दिसून येत आहे. दरम्यान या रखडलेल्या कामामुळे तेथील रहिवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच हा शहरातील महत्त्वाचा रस्ता असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर रहदारी आहे. यामुळे सतत येथे वाहतूक कोंडी देखील होत आहे. याचा त्रास सर्वसामान्य नागरिक व भाविकांना सहन करावा लागत आहे. येथे अनेक पुजाऱ्यांची घरी असल्याने येणाऱ्या भाविकांनाही मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. हा रस्ता मंदिरापासून अत्यंत जवळ असल्याने याचे रुंदीकरण लवकरात लवकर होणे गरजेचे असून, त्यामुळे येणाऱ्या भाविकांची व नागरिकांची सोय होणार आहे. तरी याबाबत लक्ष घालून यावर लवकरात लवकर कारवाईची मागणी सुनील रोचकरी यांनी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांच्याकडे केली आहे.